# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**४३) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८.०७.२०२६**

जिल्हा : अहिल्यानगर

| मागील आठवड्यातील हवामान (२१/०७/२०२६ ते २७/०७/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२९/०७/२०२६ ते ०२/०८/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | < दिनांक > | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ |
| ०.० | ५.४ | १.० | २.० | ०.० | २.२ | १.८ | पाऊस (मिमी) | ९ | १० | १८ | ३ | २ |
| ३०.२ | २९.४ | २७.२ | २७.० | २७.८ | २८.४ | २८.८ | कमाल तापमान (अंसे) | ३० | ३१ | ३१ | ३२ | ३१ |
| २०.५ | १९.९ | १९.७ | १९.५ | १९.९ | २०.१ | २०.३ | किमान तापमान (अंसे) | २५ | २५ | २४ | २४ | २४ |
| २.० | २.० | २.० | २.० | १.० | २.० | २.० | ढग स्थिती (आकाश) | ७ | ८ | ८ | ७ | ७ |
| ७४ | ८५ | ८६ | ८३ | ७८ | ८९ | ८१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८६ | ८७ | ८९ | ८६ | ८५ |
| ६५ | ६८ | ६७ | ५९ | ६३ | ६० | ६२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६६ | ६५ | ७१ | ६८ | ६३ |
| ५.३ | ५.२ | ५.९ | ६.७ | ११.५ | ७.३ | ५.१ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | १८ | २० | २० | २५ | १५ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तसेच **पुढील पाच दिवस काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | १) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>२) वीजेच्या अंदाजाचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | **गरजेनुसार पिकांमध्ये कोळपणी करून घ्यावी.** |
| कापूस | उगवण ते पाते लागणे | पेरणीनंतर १५ दिवसांनंतर प्रत्येक फुलीवर दोनच जोमदार रोपे ठेवुन बाकीची उपटून टाकावीत.<br>**बीटी कापूस (Bt Cotton):** पिकाला ३० दिवसांनंतर ओलिताच्या (पाण्याच्या) वेळी ५० किलो / हेक्टर या प्रमाणात खताचा पहिला हप्ता (Top dressing) द्यावा.<br>**बिगर-बीटी कापूस (Non-Bt Cotton):** ३० दिवसांनंतर ओलिताच्या वेळी ४० किलो नत्र (N) / हेक्टर या प्रमाणात खताचा पहिला हप्ता द्यावा.<br>**मावा, तुडतुडे आणि फुलकिडे (थ्रिप्स) नियंत्रण:** किडींच्या नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्क (Neemarks) ची फवारणी करावी.<br>**कामगंध सापळे (Pheromone Traps):** प्रति हेक्टरी ५ कामगंध सापळे वापरावेत आणि दर १५ दिवसांच्या अंतराने त्यातील ल्यूर (Lure) बदलावे. |
| तूर | रोप अवस्था | पेरणी नंतर १५ ते २० दिवसांनी पहिली कोळपणी करावी. पुढे १५ दिवसांनी खुरपणी किंवा कोळपणी करावी. शेतात पक्ष्यांना बसण्यासाठी मचान म्हणजेच इंग्रजी टी आकाराचे पक्षी थांबे ५० ते ६० प्रति हेक्टरी उभारावेत. |
| ज्वारी | रोप अवस्था | खोड माशीचा प्रादुर्भाव नियंत्रणासाठी पीक ३० दिवसांचे होईपर्यंत ५ प्लॅस्टिक फिशमील सापळे प्रति एकरी लावावेत.<br>खोड माशीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर आढळल्यास (पाऊसाची उघडीप पाहुन) इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल @ ५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मूग उडीद | पिकास फांद्या फुटताना | २० ते २५ दिवसांनी कोळपणी करून घ्यावी. तसेच तणांचे नियंत्रण करण्यासाठी शेतात निंदनी करून घ्यावी. |
| मका | रोप अवस्था | ८ ते १० दिवसांनी पहिली कोळपणी करून घ्यावी तसेच गरजेनुसार नांगे भरणी करून घ्यावे. आवश्यकतेनुसार तण नियंत्रणासाठी खुरपणी करणे. |
| भुईमूग | रोप अवस्था | १० ते १२ दिवसांनी कोळपणी करून घ्यावी. तसेच तुटाळी आढळुन आल्यास बी टोकून नांग्या भराव्यात. जमीनीत ओलावा टिकविण्यासाठी, हवा खेळती राहण्यासाठी तसेच गवताचे व तणांचे नियंत्रण करण्यासाठी हात कोळप्याने कोळपणी करुन घ्यावी. |
| सोयाबीन | रोप अवस्था | स्पोडोप्टेरा अळीच्या उपद्रवाचा आगाऊ अंदाज घेऊन नुकसान टाळण्यासाठी हेक्टरी ५ स्पोडोलूरचा वापर करण्यात आलेले फेरोमेन सापळे नियंत्रणासाठी वापरावेत. |
| भाजीपाला पिके | | फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्क किंवा कडुनिंबाचे तेल ५० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. प्रादुर्भाव अधिक आल्यास स्पिनोसॅड ४५ एससी किंवा स्पिनटोरम ११.७ एससी @ ३ |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| | | मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **लिंबूवर्गीय फळझाडे** | | लीफ मायनरचे आणि सायला यांच्यापासून होणारे नुकसान टाळण्यासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८ एस एल @ ३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **पशूसंवर्धन** | | पावसाळयात जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. पशुपालकांनी आपल्या भागात कोणत्या प्रकारचे जंत आहेत याची माहिती करून घ्यावी. जंतांचे प्रकार जाणून घेण्यासाठी जनावरांच्या शेणाची तपासणी करून घ्यावी. जंतांचे प्रकार समजल्यावर पशुवैद्यकाच्या सहाय्याने नियंत्रणासाठी व प्रमतिंधात्मक उपायांसाठी उपयुक्त व प्रभावी औषधे निवडावे. जनावरांची रोग प्रतिकारशक्ती वाढवावी. जेणेकरून जंतांच्या वाढीला आळा बसतो. त्यांचे नियंत्रण होते. याकरिता जनावरांना उत्तम संतुलित आहार द्यावा. जनावरांचा गोठा स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवणे व वेळोवेळी निर्जंतुकीकरण करणे महत्त्वाचे आहे. औषधे देतांना औषध योग्य मात्रेतच द्यावे त्याकरता वेष्टनावरील सूचना पाळाव्यात. |

**स्त्रोत** :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.

दि. : २८.०७.२०२६

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**